मी मराठी LIVE

# येऊरमधील भूमाफियांची घुसखोरी थांबवा

## आदिवासींचे जिल्हाधिकाऱ्यांना साकडे

▶ वार्ताहर

*ठाणे :* येऊर-संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाची सीमा सिमेंट काँक्रीटच्या जंगलांनी आकुंचन पावत असताना आता जंगलातही भूमाफियांनी मोठ्या प्रमाणात घुसखोरी केली आहे. येथील जांभूळपाडा आणि पाटोणपाडा परिसरातील झाडांची कत्तल करून मातीचा भराव टाकण्याचे काम सुरू आहे. यामुळे पर्यावरणाचा ऱ्हास होत असून स्थानिक आदिवासींच्या हक्कावरही गदा येत आहे. त्यामुळे या घुसखोरीला आळा घालून जंगल संरक्षित करून आदिवासींना त्यांच्या जमिनी घर वहिवाट अधिकृत करावी, अशा विविध मागण्यांसाठी शुक्रवारी आदिवासी आणि 'येऊर एन्व्हायर्मेंट सोसायटी' यांच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा नेऊन धरणे आंदोलन करण्यात आले.

मुंबई-ठाणे शहराचे नैसर्गिक फुफ्फुस म्हणून येऊर-संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाचा परिसर ओळखला जातो. मात्र या परिसरावर भूमाफियांचे अतिक्रमण सुरू आहे. या विरोधात आदिवासींनी जिल्हाधिकारी कार्यालयावर हल्लाबोल केला. येथील आदिवासी पाड्यांतील रहिवाशांना संरक्षण मिळावे, २५ वर्षे नगरपालिकेचा कर भरणाऱ्या आदिवासींच्या पाणी, वीज, रस्ते आणि शौचालयांसारख्या मूलभूत गरजा तात्काळ पुरविण्यात याव्या, अशी मागणी यावेळी सोसायटीने केली.

> "आदिवासींच्या जागांची मोजणी करून त्यांची घरे अधिकृत करण्यात यावी. येथील अनधिकृत बांधकामामुळे पाटोणपाडा आणि जांभूळपाड्यातील आदिवासींपुढे यक्षप्रश्न उभा राहिला आहे.
>
> **अपूर्वा आगवण**, येऊर एन्व्हायर्मेंट सोसायटी

बांधकाम व्यावसायिक हॉटेल्स, रिझॉर्ट उभारत असून येऊर येथील गेट क्रमांक १४ आणि १७ या ठिकाणी सरकारी जमिनीवर अतिक्रमण करण्यात आले आहे. तब्बल ५० ते ६० झाडे तोडण्यात आली आहेत तर २०० ट्रक मातीचे भराव टाकले आहेत.